माहितीचा अधिकार

**महाराष्ट्र शासन**

**औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय**

कामगार भवन, ५ वा मजला, ब्लॉक -ई, सी-२०, वांद्रे-कुर्ला संकुल, वांद्रे - पूर्व, मुंबई- ४०० ०५१.

फोन नं. -26572504/09/22/58, फॅक्स नं. - 26572474, Email ID – dirdish.mum-mh@gov.in

क्र.संऔसुवआ/सूट/२०२०/२७७८ /१, दिनांकः 8 MAY 2020

प्रति,
भोगवटादार/व्यवस्थापक
महाराष्ट्र राज्यातील सर्व कारखाने

विषय- **कारखानदारांना कामगारांच्या कामाचे तासांकरीता कारखाने अधिनियम, १९४८ च्या कलम ५१, ५२, ५४ आणि ५६ मधून सूट देणेबाबत.**

संदर्भ- शासनाचे पत्र क्र.संकीर्ण-२०२०/प्र. क्र. ३/काम-४, दिनांक ०६ मे, २०२०

उपरोक्त संदर्भाधिन विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, सद्याची राज्यातील कोविड विषाणु साथीची परिस्थिती, राज्यातील कारखान्याकडे उपलब्ध असलेल्या कामगारांची संख्या तसेच याबाबत तातडीने करावयाची आवश्यक कार्यवाही याकरीता कारखानदारांना कामगारांच्या कामाचे तासांकरीता कारखाने अधिनियम, १९४८ च्या कलम ५१, ५२, ५४ आणि ५६ मधून सूट देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास पाठविण्यात आलेला होता. त्याअनुषंगाने शासनाने संदर्भाधिन पत्रान्वये उपरोक्त बाबींचा विचार करुन कारखाने अधिनियम, १९४८ च्या कलम ६५(२) नुसार प्राप्त झालेल्या अधिकारात राज्यातील ज्या कारखान्यामध्ये कामगारांची कमतरता भासत असेल केवळ अशाच कारखान्यांना दिनांक ३० जून, २०२० पर्यंत कारखाने अधिनियम, १९४८ च्या कलम ६५(३) च्या अटींच्या अधिन राहून तसेच खाली नमूद केलेल्या अटींच्या अधिन राहून कारखाने अधिनियम, १९४८ च्या कलम ५१, ५२, ५४ आणि ५६ मधून सूट दिलेली आहे. तसेच अशा कारखान्यांना उपलब्ध कामगाराकडून १२ तासांच्या दोन पाळयांमध्ये (Shift) कारखाना चालविण्याची परवानगी देण्यात आलेली आहे.

ही सूट कारखाने अधिनियम, १९४८ च्या कलम ६५(३) च्या अटींच्या व खालील अटींच्या अधिन राहीन.

१. **अतिकालिन कामाचे वेतन हे साधारण वेतनाच्या दुप्पट दराने दिले पाहिजे.**
२. **कामगारांच्या कामाच्या वेळेतील बदलाचा रासायनिक किंवा इतर धोकादायक कारखान्यातील सुरक्षिततेवर परिणाम होणार नाही याची दक्षता घेण्याची जबाबदारी भोगवटादाराची राहील.**
३. **कोणत्याही दिवशी कामाचे तास १२ तासांपेक्षा जास्त नसावेत.**
४. **कोणत्याही दिवशी कामाचे तास हे विश्रांतीच्या वेळेसह तेरा तासापेक्षा अधिक असू नयेत.**
५. **कोणत्याही आठवडयात एकूण कामाचे तास साठ तासांपेक्षा अधिक असू नयेत.**
६. **कोणत्याही कामगारास सलग सात दिवस अतिकालिक काम देऊ नये. तसेच कोणत्याही तिमाहीत अतिकालिक कामांचे तास हे ११५ तासांपेक्षा जास्त असू नयेत.**
७. **करोना विषाणूचा फैलाव रोखण्यासाठी कारखान्याच्या भोगवटादाराने आवश्यक सर्व खबरदारी घेतली पाहिजे.**

८. कारखान्यातील उत्पादक प्रक्रियेदरम्यान दोन कामगारांमध्ये सुरक्षित अंतर ठेवावे. तसेच मास्कचा वापर अनिवार्य करावा.

९. सदर सूट कालावधी दिनांक ३० जून, २०२० पर्यंत कारखाने अधिनियम, १९४८ च्या कलम ६४ मध्ये विनिर्दिष्टीत केलेनुसार समजण्यात यावा.

डॉ. महेंद्र कल्याणकर (भा.प्र.से.)
संचालक
औद्योगिक सुरक्षा व आरोग्य,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.( अ.का.)

**प्रत-** अपर/सह/उप संचालक,
औद्योगिक सुरक्षा व आरोग्य,
मुंबई/ठाणे/वसई/कल्याण/रायगड/पुणे (कार्यक्षेत्र-१)/अहमदनगर/
पुणे (कार्यक्षेत्र-२)/सोलापूर/पुणे (कार्यक्षेत्र-३)/सातारा/कोल्हापूर/सांगली/
नाशिक/धुळे/जळगांव/औरंगाबाद/नांदेड/अकोला/अमरावती/नागपूर/चंद्रपूर/भंडारा

**सर्व अपर/सह/उप संचालक यांनी सदर पत्रास आपल्या कार्यक्षेत्रांतील कारखान्यांमध्ये व्यापक प्रसिध्दी द्यावी.**

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई - ४०० ०३२.
दुरध्वनी क्रमांक ०२२-८१०३९३ Email shrikant.pulkundwar@nic.

क्रमांक : संकीर्ण-२०२०/प्र.क्र.३/कामगार-४ दिनांक : ०६/०५/२०२०

प्रति,

संचालक,
औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय,
कामगार भवन, ५ वा मजला,
वांद्रे कुर्ला संकुल, वांद्रे (पूर्व)
मुंबई -४०००५१

**विषय** : कारखानदारांना कामगारांच्या कामाचे तासांकरिता कारखाने अधिनियम १९४८ च्या कलम ५१, ५२, ५४ आणि ५६ मधून सूट देणेबाबत

**संदर्भ**: १) महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर यांचे दि. १६ एप्रिल, २०२० चे विनंती पत्र
२) संचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य संचालनालय, मुंबई यांचे दिनांक २३ एप्रिल, २०२० चे पत्र.

महोदय,

उपरोक्त विषयी महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स इंडस्ट्रीज अँड ॲग्रीकल्चर यांच्या दिनांक १६ एप्रिल, २०२० च्या विनंती पत्राच्या अनुषंगाने आपल्या संदर्भ क्रमांक २ च्या पत्रान्वये सविस्तर अभिप्राय शासनास पाठविण्यात आलेले आहेत.

२. आपल्या अभिप्रायानुसार सद्याची राज्यातील कोवीड विषाणू साथीची परिस्थिती, राज्यातील कारखान्याकडे उपलब्ध असलेल्या कामगारांची संख्या तसेच याबाबत तातडीने करावयाची आवश्यक कार्यवाही याबाबींचा विचार करुन आपण सादर केलेल्या प्रस्तावानुसार राज्य शासनास कारखाने अधिनियम १९४८ च्या कलम ६५ (२) नुसार प्राप्त झालेल्या अधिकारात

राज्यातील ज्या कारखान्यामध्ये कामगारांची कमतरता भासत असेल केवळ अशाच कारखान्यांना दिनांक ३० जून २०२० पर्यंत कारखाने अधिनियम १९४८ च्या कलम ६५ (३) च्या अटी च्या अधीन राहून तसेच खालील नमूद केलेल्या अटीच्या अधीन राहून कारखाने अधिनियम १९४८ च्या कलम ५१,५२,५४ आणि ५६ मधून सूट देण्यात येत असून त्या कारखान्यांना उपलब्ध कामगारांकडून १२ तासांच्या दोन पाळयामध्ये (Shift) कारखाना चालविण्याची परवानगी देण्यात येत आहे.

ही सूट कारखाना अधिनियम १९४८ च्या कलम ६५ (३) च्या अटींच्या व खालील अटींच्या अधीन राहील.

i) अतिकालीक कामाचे वेतन हे साधारण वेतनाच्या दुप्पट दराने दिले पाहिजे.

ii) कामगारांच्या कामाच्या वेळेतील बदलाचा रासायनिक किंवा इतर धोकादायक कारखान्यातील सुरक्षिततेवर परिणाम होणार नाही याची दक्षता घेण्याची जबाबदारी भोगवटदाराची राहिल.

iii) कोणत्याही दिवशी कामाचे तास १२ तासापेक्षा जास्त नसावेत.

iv) कोणत्याही दिवशी कामाचे तास हे विश्रांतीच्या वेळेसह तेरा तासापेक्षा अधिक असू नयेत.

v) कोणत्याही आठवड्यात एकूण कामाचे तास साठ तासापेक्षा अधिक असू नयेत.

vi) कोणत्याही कामगारास सलग सात दिवस अतिकालीक काम देऊ नये. तसेच कोणत्याही तिमाहीत अतिकालीक कामांचे तास हे ११५ तासांपेक्षा जास्त असू नयेत.

vii) करोना विषाणूचा फैलाव रोखण्यासाठी कारखान्याच्या भोगवटादाराने आवश्यक सर्व खबरदारी घेतली पाहिजे.

viii) कारखान्यातील उत्पादन प्रक्रियेदरम्यान दोन कामगारामध्ये सुरक्षित अंतर ठेवावे. तसेच मास्कचा वापर अनिवार्य करावा.

ix) सदर सूट कालावधी दिनांक ३० जून, २०२० पर्यंत कारखाने अधिनियम १९४८ च्या कलम ६४ मध्ये विनिर्दिष्टित केलेनुसार समजण्यात यावा.

(डॉ. श्री.ल. पुलकुंडवार)
उप सचिव, महाराष्ट्र शासन